५८५ – ३ पुणे.शॉप नं ,श्रीनिवास अपार्टमेंट ,नारायण पेठ ,४११०३०
मोबाईल – ९८५०२४१५१५ , ९४२३५६६८१९

बद्रीनाथ – केदारनाथ – गंगोत्री – यमनोत्री सहल (१३ दिवस)

सहलीचा दिनवार कार्यक्रम

दिनांक	दिवस	कार्यक्रम
	पहिला	पुणे सोडणे विमानाने सकाळी डेहराडून करिता . डेहराडून आगमन व लगेचच हरिद्वार जाणे व मुक्काम (रात्रीचे जेवण) (सायंकाळी गंगा आरती ऐच्छिक) (50 km)
	दुसरा	सकाळी लवकरच हरिद्वार सोडणे स्यानाचट्टी करिता व स्यानाचट्टी आगमन व मुक्काम . (चहा ,नाष्टा ,जेवण) (218 km)
	तिसरा	स्यानाचट्टी सोडणे सकाळी ०५.०० वा . जानकीचट्टी (16 km) पर्यंत बसने प्रवास व पुढे (पायी, घोडा अथवा डोलीने) यमनोत्री दर्शनोत्तर (5 km) परत स्यानाचट्टी येणे व मुक्काम. (चहा ,नाष्टा ,जेवण)
	चौथा	स्यानाचट्टी सोडणे सकाळी ०६.०० वा . उत्तरकाशी जाणे व मुक्काम . (चहा ,नाष्टा ,जेवण) (107 km)
	पाचवा	उत्तरकाशी सोडणे सकाळी ०६.०० वा. गंगोत्री करिता व गंगोत्री दर्शनोत्तर परत उत्तरकाशी येणे व मुक्काम. (चहा ,नाष्टा ,जेवण) (100 km)
	सहावा	उत्तरकाशी सोडणे सकाळी ०६.०० वा. रामपूर फाटा जाणे व मुक्काम. (चहा, नाष्टा, जेवण) (225 km)
	सातवा	रामपूर फाटा सोडणे केदारनाथ करिता व केदारनाथ जाणे व केदारनाथ दर्शनोत्तर रामपूर येणे व मुक्काम. (केदारनाथ दर्शन हेलिकॉप्टरने अथवा पायी,घोडा किंवा डोलीने होईल.) (चहा,नाष्टा,जेवण)
	आठवा	रामपूर फाटा मुक्काम. (चहा,नाष्टा,जेवण)
	नववा	रामपूर फाटा सोडणे सकाळी ०६.०० वा. बद्रीनाथ जाणे व मुक्काम. (चहा,नाष्टा,जेवण) (205 km)
	दहावा	बद्रीनाथ स्थानिक स्थलदर्शन. माना बॉर्डर (6 km) स्थलदर्शन व बद्रीनाथ मुक्काम. (चहा,नाष्टा,जेवण)
	अकरावा	बद्रीनाथ सोडणे सकाळी ०६.०० वा. पुढे जोशीमठ (41km) दर्शनोत्तर श्रीनगर (उत्तरांचल) करिता जाणे व मुक्काम. (चहा,नाष्टा,जेवण) (145 km)
	बारावा	श्रीनगर सोडणे सकाळी ०६.०० वा. ऋषिकेश (106 km) दर्शनोत्तर हरिद्वार जाणे व मुक्काम. (चहा,नाष्टा,जेवण) (23 km)
	तेरावा	हरिद्वार सोडणे सकाळी देहरादून करिता व देहरादून सोडणे विमानाने पुणे करिता पुणे आगमन व सहल समाप्त . (55 km)

सहलीतील व्यवस्था:

१. विमान प्रवास – पुणे – देहरादून – पुणे (अतिरिक्त खर्च)

२. बस प्रवास – हरिद्वार पासून सहल पूर्ण होऊन परत हरिद्वार पर्यंत २ x २ लक्झरी पुश-बॅक बसने स्थानिक स्थलदर्शन होईल.

३. मुक्काम व्यवस्था – सर्व ठिकाणी डिलक्स दर्जाचे हॉटेल्समध्ये मुक्काम व्यवस्था केली जाईल तसेच सर्व मुक्कामांच्या ठिकाणी दोन व्यक्तींमध्ये एक रूम या प्रमाणे व्यवस्था केली जाईल.

४. भोजन व्यवस्था – विमान प्रवास वगळता सर्व ठिकाणी आमच्या आचाऱ्यांनी तयार केलेले शुद्ध शाकाहारी मिष्टांन भोजन दोन वेळा, चहा अथवा कॉफी ३ वेळा व नाष्टा १ वेळा.

सहल खर्चात समाविष्ट असलेल्या बाबी :

- प्रत्येक ठिकाणची एंट्री फी, बोट –राइड खर्च, रोप-वे खर्च सहल खर्चामध्ये समाविष्ट आहे याची नोंद घ्यावी.
- प्रत्येक सहल सभासदास विमानप्रवास वगळता आमच्या मार्फत रोज (Unlimited) मिनरल पाण्याच्या बॉटल्स मिळतील.

सहल खर्चात समाविष्ट नसलेल्या बाबी:

- यमनोत्री येथे घोडा,डोली याचा खर्च सहलखर्चात समाविष्ट नाही.
- केदारनाथ येथे हेलिकॉप्टर,घोडा,डोली याचा खर्च सहलखर्चात समाविष्ट नाही. (केदारनाथ येथील हेलिकॉप्टर चे तिकिट ही आमच्या कडून काढली जात नाही याची नोंद घ्यावी. तिकिट काढण्यासंदर्भातील सर्व मार्गदर्शन आमच्या कडून केले जाईल.)
- पुणे – देहरादून – पुणे विमान प्रवास खर्च सहलखर्चात समाविष्ट नाही.

महत्वाची सूचना

बद्रीनाथ , केदारनाथ दोन धाम ही सहल उत्तरांचल राज्यातील अती दुर्गम भागातील असून साधारणत: अक्षय तृतीया ते दिवाळीतील पाडवा याच दरम्यान आपण तेथे दर्शनासाठी जाऊ शकतो. बाकी कालावधी मध्ये ही मंदिरे पूर्णपणे बंद असतात. दर्शन कालावधी मधील ६ महिन्यातही जवळ जवळ ३ महीने मुसळधार पाऊस या भांगांमध्ये पडतो. या सर्व कारणांचा तेथील व्यवस्थेवर परिणाम होत असून साधारण स्वरूपाचे हॉटेलही खूप महाग असतात. तरी आम्ही सहलीचा खर्च हा मध्यम स्वरूपाचे हॉटेल चा दर्जा असा गृहीत धरून काढला आहे. तरी कृपया कोणीही हॉटेल्स बूकिंग बद्दल तक्रार करू नये ही विनंती.

कॅन्सलेशनविषयी थोडे

१. सहलीमध्ये एकदा ॲडव्हान्स रक्कम भरून बूकिंग केल्यानंतर येणाऱ्या कुठल्याही नैसर्गिक अडचणी (कोव्हिड चे नवीन प्रकार / पाऊस / वादळ / दंगल / निवडणूका / वैयक्तिक आजारपण / घरातील व्यक्ती निर्वतणे / अन्य कोणतीही) आल्यास व त्यामुळे आपण आपले बूकिंग रद्द (कॅन्सल) केल्यास, आपणास कुठल्याही परिस्थितीमध्ये भरलेला ॲडव्हान्स रकमेचा रोख परतावा हा परत न मिळता सदरची रक्कम कॅन्सलेशन पोटी जमा केली जाईल.

२. सहलीची मिटींग झाल्यानंतर आणि सहलीची पूर्ण रक्कम भरून झाल्यानंतर वर क्र. १ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कारणास्तव आपण आपली सहल जर ३० दिवस आधी रद्द केली तर ५०% रक्कम कॅन्सलेशनपोटी, आपण आपली सहल जर १५ दिवस आधी रद्द केली तर ७५% रक्कम कॅन्सलेशनपोटी आणि आपण आपली सहल जर ८ दिवस आधी रद्द केली तर १००% रक्कम कॅन्सलेशनपोटी कापून घेण्यात येईल. तसेच वरीलप्रमाणे कॅन्सलेशनपोटी कापून राहिलेल्या रकमेचा रोख परतावा कोणत्याही परिस्थितीत आपणास देण्यात येणार नाही. सदर कॅन्सलेशनपोटी कापून शिल्लक राहिलेली रक्कम पुढील ३६५ दिवसांत कुठल्याही सहलीमध्ये आपण सहभागी झालात तर ती ॲडजेस्ट केली जाईल.

३. सदरील सहलीमध्ये विमानाचे तिकीट हे नॉन-रिफंडेबल (Non-Refundable) असेल याची प्रामुख्याने नोंद घ्यावी.

सहलीतील स्थल दर्शनाचा तपशील:

- हरिद्वार – बळी राक्षसाला प्रसन्न होऊन तीन पावलांत संपूर्ण संसार व्यापताना भगवान विष्णूंनी आपले तिसरे पाऊल या ठिकाणी ठेवले अशी पौराणिक कथा प्रसिद्ध आहे. भगवान विष्णूंनी पाऊल जेथे ठेवले अशी हरी की पायरी, गंगा मंदिर.
- ऋषिकेश – गंगा नदीच्या किनारी असलेले ऋषीस्थान म्हणून प्रसिद्ध, लक्ष्मण झूला, कैलास आश्रम, गीता मंदिर व परमार्थ निकेतन, इ.
- देव प्रयाग – भागिरथी व अलकनंदा या दोन नद्यांचे संगमाचे स्थान
- रुद्रप्रयाग – अलकनंदा व मंदाकिनी या दोन नद्यांचे संगमाचे स्थान.
- गौरीकुंड – माता पार्वतीने येथील गरम पाण्याच्या कुंडामध्ये स्नान केले होते.
- श्री केदारनाथ – बारा ज्योतिर्लिंगांनपैकी एक असलेले भगवान शंकरांचे स्थान. अत्यंत प्राचीन केदारनाथ मंदिर तसेच मंदाकिनी नदीचे उगमस्थान व आद्य शंकराचार्यांचे समाधीस्थान.
- सोनप्रयाग – सोनगंगा व मंदाकिनी या दोन नद्यांचे संगमाचे स्थान.
- गुप्तकाशी – भगवान शंकरांचे मंदिर.
- कर्णप्रयाग – सूर्याने कर्णाला कवचकुंडले या ठिकाणी प्रदान केली होती असे वर्णन पुराणात आहे. अलकनंदा व कर्णावती या दोन नद्यांचे संगमाचे स्थान.
- श्री बद्रीनारायण – भारतातील चारही दिशांचे जे चार धाम आहेत त्यापैकी एक. भगवान विष्णू मंदिर दर्शन तसेच गरम पाण्याचे कुंड.
- माना – भारतातील उत्तरेकडील शेवटचे टोक व सरस्वती नदीचे उगमस्थान.
- उत्तरकाशी – उत्तरेकडील विश्वेश्वराचे मंदिर म्हणून उत्तरकाशी प्रसिद्ध आहे.
- गंगोत्री – राजा भगिरथाने गंगा नदी पृथ्वीवर आणण्यासाठी ज्या ठिकाणी तप केले होते ति भगिरथ शिला व गंगा नदीचे मंदिर.
- यमनोत्री – यमुना नदीचे उगमस्थान व गरम पाण्याची कुंडे.

Cancellation Policy (as per Indian Government)	
Condition	Cancellation Charges
21 Days prior (Excluding departure date)	30% of the package cost
21 – 15 Days (Excluding departure date)	55% of the package cost
14 – 08 Days (Excluding departure date)	80% of the package cost
07 – 0 Days / No Show	100% of the package cost